**प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली**
**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रत्नागिरी जिल्हा)**
**(०२३५८) २८२३८७**

**अंक ८७/२०१७** **दिनांक ३१/१०/२०१७** **कालावधी ५ दिवस**


| | | |
|---|---|---|
| **डॉ. सुभाष चव्हाण,** | **डॉ. ज्ञानेश्वर जगताप,** | **प्रा. विरेश चव्हाण,** |
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी, |
| कृषिविद्या विभाग | कृषिविद्या विभाग | कृषिविद्या विभाग |
| ९४२२४३१०६७ | ९४०३९८८१४३ | ९४२२०६५३४४ |


**मागील हवामान सारांश**
**दि. २७/१०/२०१७ ते ३१/१०/२०१७**

| | | |
|---|---|---|
| पाऊस (मिमी) | : | ०.० |
| पाऊस (मिमी) १/१/१७ पासून | : | ३६०९.९ |
| पाऊस (मिमी) (गेल्या वर्षी) | : | ४५०४.१ |
| कमाल तापमान (अं.से) | : | ३१.७–३४.५ |
| किमान तापमान (अं.से) | : | १७.६–२२.४ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | : | ७८–९६ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | : | ३३–६ |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | : | १.१–२.१ |

**हवामान पूर्वानुमान (०१/११/२०१७ सकाळी ८:३० पासून ०५/११/२०१७ सकाळी ८:३० वाजेपर्यंत)**

| **हवामानांचे घटक** | : | **०१/११** | **०२/११** | **०३/११** | **०४/११** | **०५/११** |
|---|---|---|---|---|---|---|
| पाऊस (मिमी) | : | ० | ० | ० | ० | ० |
| कमाल तापमान (अं.से) | : | ३६ | ३७ | ३७ | ३६ | ३५ |
| किमान तापमान (अं.से) | : | २२ | २२ | २२ | २३ | २५ |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | : | १ | ४ | ३ | १ | १ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | : | ६५ | ६८ | ६६ | ६८ | ७१ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | : | ३२ | ३४ | ३२ | ३४ | ३७ |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | : | ००८ | ००८ | ००८ | ०१० | ०१० |
| वाऱ्याची दिशा | : | नै.प. | नै.द. | नै.द. | नै.द. | नै.प. |

**:हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला:**

**दिनांक १ ते ५ नोव्हेंबर, २०१७ पर्यंत अवकाश अंशत: मेघाच्छादित राहिल. दिनांक १ ते ५ नोव्हेंबर २०१७ पर्यंत वाऱ्याचा वेग ८ ते १० किमी प्रति तास राहिल.**

| पिक | पिक अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **भात** | **परिपक्वता** | • तयार झालेल्या भात पिकाची सकाळी कापणी करून त्याची लगेच मळणी करावी आणि भात उन्हामध्ये चांगले वाळवावे. |
| **आंबा, काजू** | –– | • आंबा बागांमध्ये तुडतुडयांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. नियंत्रणासाठी डेल्टामेथ्रिन २.८ ई. सी. ९ मि. ली. प्रति १० लिटर पाण्यातून फवारणी करावी. द्रावणात स्टिकरचा वापर करावा. फवारणी खोडावर, फांदयांवर व बागेच्या आजुबाजूच्या रायवळ आब्यांनासुध्दा करावी.<br>• काजूवरील ढेकण्याचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता आहे. त्यासाठी लॅमडा सायहेलोथ्रिन ५ टक्के ६ मि. ली. प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे. द्रावणास स्टिकरचा वापर करावा. (सदर नमुद केलेले किटकनाशक लेबलक्लेम नाही.) |
| **नारळ/ सुपारी** | –– | • नारळाच्या कोमकुजव्या रोगाच्या नियंत्रणासाठी कुजलेला कोम साफ करून त्यामध्ये १ टक्का बोर्डो मिश्रण किंवा कॉपर ऑक्सीक्लोराईड २५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून ओतावे.<br>• नारळावरील गेंडाभुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी बागेमध्ये शेणखताच्या खड्डयात दर दोन महिन्यांनी कार्बारील पावडरचे (१० लिटर पाण्यात २० ग्रॅम) मिश्रण तयार करून फवारावे.<br>• नारळावरील सोंडया भुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी भुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी भुंग्यानी पाडलेली भोके १० टक्के कार्बारील भुकटी व वाळूने बुजवून घ्यावीत. तसेच खोडावर १ मिटर उंचीवर गिरमिटाच्या सहाय्याने १५ ते २० सें.मी. खोल तिरपे भोक पाडून त्यामध्ये २० मिली ३६ टक्के प्रवाही मोनोक्रोटोफॉस किंवा २० टक्के प्रवाही क्लोरोपायरीफॉस नरसळयाच्या सहाय्याने ओतावे आणि भोक सिमेंटच्या सहाय्याने बंद करावे. |
| **भाजीपाला लागवड** | | • पडवळ, घोसाळी, शिराळी इत्यादी फळीभाज्यांवर फळमाशीचा प्रादूर्भाव होण्याची शक्यता आहे, त्याच्या नियंत्रणासाठी "रक्षक" सापळे प्रती हेक्टरी ४ नग लावावेत.<br>• रब्बी हंगामासाठी टोमॅटो, वांगी व मिरची यांची रोपे तयार करावीत. |
| **दुभती जनावरे/ शेळया** | – | • जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ पाणी पुरवठयाची व्यवस्था करावी. |
| **सुचना** | – | • निरनिराळे किडी, रोग जास्त प्रमाणात आढळल्यास नजिकच्या कृषि विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषि अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. |